# भारतातील बौद्ध धम्माची चळवळ

संपादक

डॉ. पंजाब चव्हाण डॉ. रामचंद्र भिसे प्रा. हनुमंत जवळगे



३०) बुद्ध आणि कार्ल मार्क्स यासंबधी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा दृष्टिकोन -
प्रा. गायकवाड सुहास कचरुबा/प्रा. सरवदे महादेव मारोती/१८२

३१) बुध्द आणि मार्क्स (आंबेडकरी दृष्टिकोणातून) -
श्री मोकासरे जी.टी./१८६

३२) बुद्ध आणि कार्ल मार्क्स (आंबेडकरी विचारधारा) -
प्रा.डॉ.अनिता बाळके /१९१

३३) मार्क्स विचारप्रणित कामगार संघटनेची आंबेडकरीय दृष्टिकोणातून मीमांसा -
प्रा.आडेराघो जी.एच. / प्रा.रगडे एस.आर./२००

३४) भगवान बुध्द आणि कार्ल मार्क्स यांचे तत्वज्ञान -
एक आंबेडकरी दृष्टिक्षेप - प्रा.डोंगरे एल.बी/२०७

३५) बुद्ध आणि मार्क्स - आंबेडकरी दृष्टिकोन -
प्रा.डी.के.कदम/२१२

३६) मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद -
मरबाळीकर स्मिता काशिनाथ /२१८

३७) आंबेडकर: बुध्द आणि मार्क्स -
माटे व्यकंटी गोविंदराव /२२२

३८) बुद्ध आणि कार्ल मार्क्स डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन -
प्रा. नरवाडे बी. एम./२२९

३९) बुद्ध आणि मार्क्स यांच्या सिंध्दातातील समानता -
डॉ. सुशीला फुले/२३४

४०) Buddha and Marx ( Ambedkarian Perspective) -
प्रा.डॉ.कविता सोनकांबळे/२४१

४१) बुद्ध मार्क्स - आंबेडकरी दृष्टिकोन -
प्रा. संध्या डी. कदम/२४७

४२) बुद्ध आणि मार्क्स एक तौलनिक अभ्यास -
प्रा.आझादे ज्ञानदेव रामा/२५२

४३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीकोणातून बुध्द व मार्क्स.-
प्रा. भगवान माधवराव लोखंडे/२५८

४४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोणातून बौद्ध धर्म व कार्लमार्क्स -
प्रा. बाळसाहेब रमेशराव नरवाडे /२६४

# "बुद्ध आणि मार्क्स - आंबेडकरी दृष्टिकोन"

**प्रा.डी.के.कदम**

समाजशास्त्र विभागप्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत बौद्ध धर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मानवी समाजाला शांततेचा मार्ग दाखविण्याचे कार्य बौद्ध धर्माने केले आहे. बौद्ध धर्माने वैदिक धर्मातील यज्ञ व कर्मकांडाला विरोध केला. जातीयव्यवस्थेला विरोध केला. प्राचीन भारतीय धार्मिक संस्थाच्या व समाजाच्या दृष्टिने बौद्ध धर्माला एक विशेष महत्त्व आहे. वर्ण व्यवस्थेने ताठर स्वरुप धारण केले होते. शूद्र वर्णाला त्यांच्या अधिकारापासून वंचित केले होते. संपुर्ण मानवजातीला कुलयोग, वर्ण, जाती, देश इत्यादी मर्यादाचा त्याग करुन निःश्रेयाचा मार्ग सांगणारा पहिला विश्वधर्म म्हणजे बौद्ध धर्म होय. आध्यात्मिक लोकशाहीचा साक्षात्कार घडविणारा बौद्ध धर्म संस्थापक गौतम बुद्ध होय. इ.स.पू.सहावे शतक हे प्राचीन भारताच्या इतिहासातील एक क्रांतीकारक शतक मानल्या जाते. इ.स.पूर्व सहाव्या शतकात गौतम बुद्धांनी सामानतेचा पाया घातला. मार्क्सने आपल्या विचारप्रणालीत साम्यवाद मांडला, परंतु डॉ.बाबासाहेब म्हणतात मार्क्सच्या अगोदर बुद्धाने २४०० वर्षापूर्वी हीच गोष्ट सांगीतली आहे. मार्क्सने त्यांच्या साम्यवादात घपिळवणूकङ हा शब्द वापरला. गौतम बुद्धाने दुःख हा शब्द वापरला होता. ज्यावेळी कुणीही एक व्यक्ती वा घटक समाजातील दुसज्या व्यक्तीचे वा घटकांची पिळवणूक करतो. तेंव्हा दुसज्या घटकाला दुःख होते. म्हणून पिळवणूक शब्दाचा अभिप्रेत अर्थ दुःख असा होतो. बौद्ध तत्त्वज्ञानाचा मूलभूत पाया व कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा पाया यात कसलाच फरक नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, कार्ल मार्क्सने सांगितलेला सिद्धांत यात काही नवीन नाही. कारण गौतम बुद्धाला घोर तपश्चर्येनंतर हे ज्ञान प्राप्त झाले ते ज्ञान प्रथम सारनाथ येथे आपल्या प्रवचनात त्यांनी सांगितले त्यामुळे पिळवणूक दुःख समजण्यासाठी मार्क्सवाद स्वीकारण्याचे कारण नाही. डॉ.बाबासाहेबांनी स्वतःसाठी आणि दलितांच्या उत्थानासाठी बौद्ध धर्म स्वीकारला.

गौतम बुद्धाने आपल्या तत्त्वज्ञानातून दुःखच सांगितले नाही तर दुःखाची कारणे, दुःखावर मात करण्याचे उपायही सांगितले आहेत. त्यामुळे डॉ.बाबासाहेब

आंबेडकर बौद्ध धर्माकडे आकर्षित झाले असावेत. बुद्धांच्या तत्त्वज्ञानात देव नसून, मानव हा केंद्रबिंदू असून त्यांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान समाजातील विषमता नष्ट करुन सामाजिक समता निर्माण करणे आहे. बौद्ध तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य, समता, बंधुता, समान संधी, सामाजिकता ही तत्त्वे आहेत. बुद्धांचे तत्त्वज्ञान हे मानव विकासाचे तत्त्वज्ञान आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो अनुयायासह नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. इ.स.१९५६ ला राजे महेंद्र यांच्या अध्यक्षतेखाली काठमांडू येथे जागतिक बौद्ध परिषदेच्या समाप्तीपूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध व कार्ल मार्क्स या विषयावर भाषण देऊन मार्क्सवादापेक्षा बुद्ध तत्त्वज्ञान कसे श्रेष्ठ आहे ते स्पष्ट केले.

मार्क्सच्या विचारसणीचा मूळ आरंभ असा आहे, जगात पिळवणूक चालली आहे. ही पिळवणूक भांडवलदाराकडून, धनिकाकडून गरीबांची होत आहे. कारण धनिकांना, भांडवलदारांना संपत्तीची हाव आहे. त्यांना अधिकाधिक मालमत्ता हवी आहे. त्यासाठी ते जनसमुदायास गुलाम करीत आहेत. ही गुलामगिरी शेवटी यातना, दुःख व गरिबी यांच्या निर्मितीस कारणीभूत आहे. हेच मार्क्सवादाचे मूळ आहे.

मार्क्स विचारसरणीत समाजात दोन वर्ग आहेत. एक भांडवलादारांचा, आहेरे चा - दुसरा कामगारांचा नाहीरेचा. कामगार वर्ग आपल्या श्रम शक्ती पासून जास्त उत्पादन करतो, परंतु अतिरिक्त उत्पादनाचा फायदा भांडवलदारांना होतो. अतिरिक्त उत्पादनावर कामगारांचा हक्क राहत नाही. मार्क्सला अतिरिक्त उत्पादनावर भांडवलदाराचा हक्क असू नये तो अधिकार राज्याचा असावा हे राज्य कामगारांचे असावे. शोषितांचे म्हणजे पिळवणूक होत असलेल्या कामगारांचे. मार्क्सने आपल्या विचारसरणीत हिंसात्मक मार्गांनी क्रांती केली. तो कामगारांना आव्हान करतो. तुम्ही भांडवलशाहीच्या विरोधी क्रांती करा, संघर्ष करा. यात तुमचा पराभव झाला तर तुमच्यापाशी गमावण्यासारखे काही नाही, परंतु संघर्षात तुम्ही जर भांडवलदारांचा पराभव केला. तर तुमच्या हातात सत्ता येईल. उत्पादनाच्या साधनावर तुमची मालकी प्रस्थापित होईल. भांडवलदारांची जागा कामगार वर्ग घेईल. भांडवलशाही हुकूमशाही जाऊन कामगारांची हुकूमशाही येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते इ.स.१९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती झाली. रशियात जी हुकूमशाही निर्माण झाली, ती हुकूमशाही कामगार वर्गाची नाही तर ती कम्युनिस्ट पार्टीच्या अधिकाऱ्यांची होती. हे अधिकारी थोडयाफार प्रमाणात

अर्थिक तृष्णेला आपल्या ताब्यात ठेवू शकतील. परंतु सत्तेच्या तृष्णेला ताब्यात ठेवणे अतिशय कठीण आहे. सत्तेच्या भुकेवर नियंत्रण ठेवले जाऊ शकत नाही. सत्तेची भूक समाजासाठीच नाही तर सत्तेच्या भुकेल्या व्यक्तीसाठीही धोक्याची आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. कारण सर्व अधिकार स्वतःकडे ठेवणारा हुकूमशहा होणे त्यांना आवडत नव्हते. त्यांना शेवटी हुकूमशाही भांडवलदारांची असो वा कामगार वर्गाची ती हुकूमशाही व्यवस्था पटत नव्हती. हुकूमशहा निर्दयी व क्रूर असतो त्यामुळे भारतीय राज्यघटनेत प्रत्येकांचा विचार केला म्हणून त्यांना मार्क्सवादापेक्षा बुद्ध तत्त्वज्ञान अत्यंत महत्त्वाचे वाटते.

बुद्धाचा मार्ग हा प्रेमाचा, अहिंसेचा, आपुलकीचा आहे. प्रेमाने, आपुलकीने व्यक्तीचे मत वळविणे हा होता. बुद्धांचा मार्ग जास्त दूर असला तरी तो अत्यंत चांगला आहे. तेथे व्यक्ती स्वातंत्र्याची हमी आहे. हे डॉ.बाबासाहेबांनी जाणले होते. हेच मार्क्सवादी विचारांचा पाया आहे. कार्ल मार्क्सची विचारसरणी हिंसेची शिकवण देणारी आहे. मार्क्सच्या साम्यवादाचा मार्ग हा अत्याचाराचा स्वीकार करायला लावणारा मार्ग आहे. भांडवलदारांची हत्या करुन भांडवलशाहीचा नायनाट करणे हाच त्यांचा एकमेव उद्देश आहे, ते जगातील कामगाराला आवाहन करतात एक प्रकारची हिंसेची चेतना देतात जगातील कामगारांनो एक व्हा. तुम्हाला वाटेल ते करा, परंतु भांडवलशाहीचा नाश करणे हाच तुमचा उद्देश आहे. भांडवलशाहीचा नाश करण्याची कोणतीही साधने वापरा ती साधने नैतिक असोत किंवा अनैतिक असोत याचा विचार करु नका. साधनापेक्षा आपले उद्दिष्ट प्राप्त करणे महत्त्वाचे आहे असा त्यांचा विचार होता. त्यामुळे इ.स. १९१७ साली रशियात क्रांती झाली. ती साम्यवादी क्रांती म्हणून ओळखली जाते. या क्रांतीत अनेक वाईट मार्गांचा अवलंब करण्यात आला. रशियातील झार बादशाहांच्या कुटुंबाची हत्या करण्यात आली. हया क्रांतीत मार्क्सवादी विचारांचा विजय झाला, परंतु मोठया प्रमाणात हिंसा झाली. या हिंसेबरोबर अनैतिक मार्गांचा अवलंब करण्यात आला.

बौद्ध धर्मात अनैतिकता आणि हिंसा याला अजिबात स्थान नाही. बौद्ध धर्माला हिंसा मान्य नाही. हिंसेने हिंसा वाढते. हिंसेने कधीही कोणताही प्रश्न सुटू शकत नाही. हिंसेला अहिंसेने जिंकावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गौतम बुद्धांच्या गृहत्यागाचे कारण सांगतांना स्पष्ट केले की, गौतम बुद्धांना हिंसा मान्य नव्हती. हिंसा नको होती. त्यामुळे त्यांनी राजवैभव, सुंदर पत्नी, लहान बालक, वृद्ध मातापिता यांना सोडून गृहत्याग

केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सऐवजी बुद्ध स्वीकारला. कारण मार्क्सनी जेंव्हा भांडवलशाहीच्या विरुद्ध व्यापक वर्ग संघर्ष व हिंसक क्रांती म्हणून एकमेव अस्त्राची घोषणा केली. त्यामुळे हिंसेने कोणतीच समस्या व्यवस्थितपणे सोडवू शकत नाही. हिंसेला जगात मान्यता मिळत नाही. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाणले होते म्हणून अहिंसेच्या मार्गाने प्रयत्न केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात रशियातील लोकांनी साम्यवादी विचारसरणी सहजासहजी स्वीकारली नाही, स्वतः रशियन जनतेने मान्य केली नाही. तर ती साम्यवादी विचारसरणी स्वीकारण्यासाठी जबरदस्ती करण्यात आली. म्हणजेच साम्यवाद प्रस्थापित करतांना त्यांना ही भिती घातली गेली आणि त्यांनी साम्यवादी विचारसरणी स्वीकारली नाही तर त्यांना फासावर लटकविले जाईल. त्यामुळेच ते साम्यवाद विचारसरणी भयापोटी पाळत आहेत. भयापोटी कोणतीच विचारसरणी मूळ धरू शकत नाही. बुद्धांनी कालमानाना उपदेश करतांना म्हणतात. कोणतेही गोष्ट कुणी सांगीतली आहे म्हणून स्वीकारु नका. हा आपला गुरू आहे म्हणून स्विकारु नका, तर जेंव्हा तुम्ही स्वतःहूनच असा अनुभव घ्याल की या गोष्टी हितकारक आहे. ज्यावेळी निर्दोष आहेत. त्या गोष्टी स्वीकारल्या तर त्या गोष्टी हिताला व सुखाला कारणीभूत आहेत. तेंव्हा कलमानांनो तुम्ही त्या स्वीकारा आणि त्यांना अनुसरूनच आचारण करा. म्हणजे ज्या तत्त्वज्ञानाने मानवाचे कल्याण होईल असे तत्त्वज्ञान स्वीकारा असा उपदेश हा म्हणजेच मानवी बुद्धीचा, स्वातंत्र्याचा वैचारिक जाहिरनामा होता. कारण बुद्धाची विचारसरणी ही लोकशाहीची विचारसरणी आहे. ती कुणावर लादलेली नाही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना बुद्ध तत्त्वज्ञान हे मार्क्सवादापेक्षा महत्त्वाचे वाटले.

मार्क्सने त्यांच्या विचारसरणीत प्रत्येक गोष्टीचा आधार फक्त आर्थिक असतो. सर्वात जास्त महत्त्व आर्थिक घटकाला आहे. मार्क्सने अर्थ म्हणजे सर्व काही हे समीकरण मांडले. माणुस आर्थिक दृष्टिने जितका उच्च असेल, तितकाच तो नैतिक दृष्टिने सुद्धा उच्च असतो. हे मार्क्सवादी तत्त्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नव्हते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, सत्य, लोकतंत्र, सामाजिक सांमजस्य इत्यादी मूल्य आहेत. ते मार्क्सवादाने सामाजिक व्यवस्था ही समानता हे मूल्य प्राप्त करु शकेल इतर मूल्य ती प्राप्त करु शकत नाही. इतर मूल्य प्राप्त करण्याची योजना नाही म्हणून मार्क्सवादी विचारसरणी आंबेडकरांच्या बुद्धीला पटली नाही.

कार्ल मार्क्सनी आपल्या विचारसरणीत वैयक्तिक मालकीची संपत्ती ही भांडवलशाहीच्या सर्व समस्याचे मूळ कारण आहे. असे सांगितले. त्याचा हेतू खाजगी मालमत्ता कायदयाने संपवणे हा होता. परंतु बुद्धांनी मानवी प्रवृत्तीवर आळा घालून खाजगी मालमत्ता संपवणे महत्त्वाचे आहे. तृष्णा संपविली की, खाजगी मालमत्तेचा प्रश्न व समस्या सगळे आपोआप सुटतील असा उत्तम मार्ग सांगीतला. डॉ. बाबासाहेबांना असे दिसून आले की, मार्क्सपेक्षा बुद्धांनी खाजगी संपत्तीची समस्या नाटपणे शांततेने कायमची सोडविली होती. बौद्ध भिक्षू म्हणजे बौद्ध समाजापुढे असणाऱ्या, दिसणाऱ्या व राहणाऱ्या आदर्श व्यक्ती होत्या. भिक्षूजवळ तर खाजगी संपत्तीच नव्हती. भिक्षू म्हणून दीक्षा घेण्यापूर्वी त्यांच्याजवळ काही खाजगी संपत्ती होती ती त्यांनी सोडून दिली होती. म्हणून मार्क्सपेक्षा बुद्धाचा मार्ग महत्त्वाचा वाटला.

धम्म ही एक बुद्धीवादी नैतिकता आहे. म्हणून नैतिक दृष्टिने चांगली साधने सुखी समाज निर्माण करतात. शहाण्या व बुद्धीवादी समाजाच्या निर्मितीसाठी, दलितांच्या उद्धारासाठी फक्त नैतिक दृष्टिने चांगली साधनेच वापरली पाहिजेत. बौद्ध तत्त्वज्ञानाला हिंसा मान्य नाही. नैतिक शिकवणी व प्रेमाने लोकांची मने वळविणे यावर बुद्धांचा भर होता. साम्यवादाला हिंसेचाच मार्ग पसंत आहे. साम्यवादाचा मार्गाने ताबडतोब फलप्राप्ती होते ही प्राप्ती योग्य नाही म्हणून बुद्धीचा मार्ग मंदगतीचा व लांब पल्याचा आहे. यातून फल प्राप्ती उशिरा होते. बुद्धांच्या मार्गात सुरक्षितता आहे. बुद्धांचा मार्ग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना महत्त्वाचा वाटला म्हणून त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला.

बौद्ध धर्मात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांना महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध धर्म मानवाच्या विकासासाठीचा मार्ग आहे. चार आर्य सत्ये म्हणजे दुःखांची जाणीव करुन देणारी, त्या दुःखावर मात करुन संपुर्ण मानवी समाज हा सुखी होवू शकतो असा आर्य अष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यकदृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्म, सम्यक उपजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक समाधी या आठ पायऱ्यांचा समावेश बौद्ध धर्मात आहे.

प्रज्ञा, करुणा, ज्ञान, शील, त्याग व संयम ही तत्त्वे बौद्ध धर्मात आहेत. बुद्धांनी सांगितलेल्या बुद्धीवाद सदसद विवेक मानवतावादी धर्म समाजात समता निर्माण करणारा होता. तसेच बौद्ध धर्मात प्रज्ञा, शील, समाधीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शील, नैतिक दृष्टिने चांगले चरित्रशील, चांगली वागणूक, जिच्यामु [illegible] :च्या

उन्नतीबरोबर समाजाची सुद्धा उन्नती होईल. शीलपालन करण्यामध्ये सुद्धा बुद्ध मध्यममार्गाचे पालन होते. बौद्ध धर्म हा पुर्णपणे नैतिकतेने भरलेला आहे. अस्पृश्य दलित समाजाच्या उत्थानासाठी मार्क्स तत्त्वज्ञानपेक्षा बौद्ध तत्त्वज्ञान श्रेष्ठ आहे हे पटल्यानंतरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

**संदर्भग्रंथ :-**


१) डॉ. डी.डी.बंदिष्टे गौतम बुद्धाचा धम्मच जगाला वाचवू शकेल, एक्सप्रेस पब्लिकेशन हाऊस, कोल्हापूर.

२) डॉ.प्रदीप आगलावे भारतीय समाज संरचना आणि समस्या.

३) दीक्षा सकाळ विशेषांक २०११.

४) दीक्षा सकाळ विशेषांक २०१२.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समुग्र भाषणे खंड - १०, संपादक - प्रदीप गायकवाड, क्षितिज पब्लिकेशन नागपूर ४४००१७.

६) प्रा.सौ.ज्योती डोईफोडे, भारतीय समाजातील प्रमुख धर्म, कल्पना प्रकाशन, नांदेड.

७) डॉ.एस.एस.गाठाळ, भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.